# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २७१ - २२ दिनांक १०/०९/२०२२

## घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीतांना गजाआड करुन १५ गुन्हयांची उकल - पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

दिनांक १९/०७/२०२२ रोजी पहाटे ०४. ३० वा. चे सुमारास पेल्हार पोलीस ठाणे हददीतील हॉटेल साई दर्शन रेस्टॉरंस्ट, बार व लॉजिंग तसेच नवकार ट्रेडर्स, वसई फाटा, वसई (पु.) येथील फिर्यादी श्री. मनीष चंद्रमा सिंग व साक्षीदार यांचे हॉटेल व दुकानाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने शटरचे लॉक तोडून त्यावाटे आत प्रवेश करुन फिर्यादी व साक्षीदार यांचे कॅश काऊंटरमध्ये ठेवलेली एकुण ६६,०००/- रुपये रोख रक्कम चोरी करुन चोरुन नेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर पेल्हार पोलीस ठाणे येथे दिनांक १९/०७/२०२२ रोजी गु.रजि.नं. I ६१८/२०२२, भा. दं. वि. सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ घटनास्थळास भेट दिली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या व तांत्रिक माहीतीच्या आधारे गुन्हयातील अज्ञात आरोपीतांची ओळख पटवून अभिलेखावरील सराईत आरोपी नामे १) इमरान अन्सारी ऊर्फ छोटे ऊर्फ इमो, रा. मालवणी, मुंबई २) शफीउल्ला अतिउल्ला ऊर्फ सोनु, रा. बिलालपाडा, नालासोपारा (पु.) यांना सापळा रचुन त्यांचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने दिनांक ०४/०९/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करण्यात आली. तपासादरम्यान नमूद आरोपीतांकडून १) वेगवेगळया कंपन्यांचे एकुण २० मोबाईल फोन, २) ५३.३३० ग्रॅम सोन्याचे दागिने, ३) ४२.६७० ग्रॅम चांदीचे दागिने, ४) एक मोटर सायकल, ५) १६,२००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ४,०४,१००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन मालमत्ते संदर्भातील खालील एकूण १५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

**उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर, कायदा व कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार | गु.रजि.नं. I ६१८/२०२२, भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०, ३४ प्रमाणे |
| २ | पेल्हार | गु.रजि.नं. I ७१८/२०२, भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे, |
| ३ | पेल्हार | गु.रजि.नं. I ७६२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ४ | पेल्हार | गु.रजि.नं. I ७६३/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ५ | पेल्हार | गु.रजि.नं. I ७६४/२०२२, भा.दं.वि.सं.कलम- ४५७,३८० प्रमाणे |
| ६ | पेल्हार | गु.रजि.नं. I ३११/२०२२, भा.दं.वि.सं.कलम-३८० प्रमाणे |
| ७ | पेल्हार | गु.रजि.नं. I ६५९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |
| ८ | पेल्हार | गु.रजि.नं. I ७०५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |
| ९ | पेल्हार | गु.रजि.नं. I १९८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |
| १० | पेल्हार | गु.रजि.नं. I ७२१/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ११ | **आचोळे** | गु.रजि.नं. I ४४२/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| १२ | **गोरेगाव** | गु.रजि.नं. I ८८१/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे |
| १३ | **वसई रेल्वे** | गु.रजि.नं. I ६५५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२, ४११, ३४ प्रमाणे |
| १४ | **वसई रेल्वे** | गु.रजि.नं. I ६५४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९, ४११, ३४ प्रमाणे |
| १५ | **वसई रेल्वे** | गु.रजि.नं. I ६४५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |

नमुद सराईत आरोपीत नामे १) इमरान अन्सारी ऊर्फ छोटे ऊर्फ इमो यांचेवर मालवणी, वालीव, नवघर, काशिमिरा, नालासोपारा या पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली ११ गुन्हे दाखल असुन आरोपीत नामे २) शफीउल्ला अतिउल्ला ऊर्फ सोनु याचेवर नालासोपारा, वालीव, कुर्ला या पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली ४ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पो.ना. प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर यांनी पार पाडलेली आहे.

--------------------oooo---------------------

# पेल्हार पोलीस ठाणे


# पेल्हार पोलीस ठाणे

# पेल्हार पोलीस ठाणे